मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# महापालिकेत अंदाजपत्रकासाठी आढावा बैठक यशस्वीरीत्या संपन्न

## अंदाजपत्रक तयार करताना आर्थिक परिस्थिती, पारदर्शकता आणि परिणामकारकता यांना प्राधान्य देणे आवश्यक : आयुक्त श्रावण हर्डीकर

**पिंपरी | प्रतिनिधी**

अंदाजपत्रक तयार करताना आर्थिक परिस्थिती, पारदर्शकता आणि परिणामकारकता यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. विविध विभागांनी नागरिकांच्या दैनंदिन गरजा लक्षात घेऊन नियोजन करावे. नागरी केंद्रित विकास हा महापालिकेच्या कामकाजाचा केंद्रबिंदू राहील आणि त्या दृष्टीने सर्व विकासकामे गुणवत्तापूर्ण व वेळेत पूर्ण करण्यावर भर दिला जाईल. तसेच यामध्ये उपलब्ध संसाधनांचा योग्य व कार्यक्षम वापर करून नागरिकांना अधिक सक्षम व दर्जेदार सुविधा देताना लोकप्रतिनिधींचे सहकार्य देखील प्रशासनाला लाभणार आहे, असे मत आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी व्यक्त केले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या २०२६-२७ या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकाचा आढावा घेण्यासाठी दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृह येथे आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी आयोजित केलेल्या अधिकाऱ्यांच्या बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस महापौर रवि लांडगे आणि सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे हे उपस्थित होते.

तसेच बैठकीस अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, विक्रांत बगाडे, सह आयुक्त मनोज लोणकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रविण जैन, नगरसचिव मुकेश कोळप, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, मुख्य आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे, अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार, सहशहर अभियंता अजय सुर्यवंशी, मनोज सेटीया, उप आयुक्त अण्णा बोदडे, संदीप खोत, चेतना केरूरे, व्यंकटेश दुर्वास, ममता शिंदे, पंकज पाटील, राजेश आगळे, सहाय्यक आयुक्त अमित पंडीत, सिताराम बहुरे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह संबंधित विभागांचे विभागप्रमुख, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



### दीर्घकालीन विकासाच्या आराखड्यावर भर..

» पुणे व परिसरातील बी.टेक इंजिनिअर अथवा संबंधित क्षेत्रातील व्यक्तींना मुलाखतीद्वारे निवडले जाते. फ्रेंच येथील किओलिस या कंपनीकडून त्याचे नियंत्रण राहणार आहे. या उमेदवारांकडून चार महिन्यांचे प्रशिक्षण पूर्ण करुन घेतले जाते. त्यातून उमेदवार निवडले जातात. सध्या या सर्व महिला पायलटना थेट ट्रेन चालविण्याचे प्रशिक्षण दिले जात आहे. माण डेपो येथे त्यांचे प्रशिक्षण सुरु आहे. त्यानंतर त्यांची शारीरिक तंदुरुस्ती चाचणी घेतली जाते. पायलट म्हणून निवड झालेल्या तरूणींच्या चेहऱ्यावर या 'हटके' काम शिकत असल्याचा आनंद दिसून आहे.

"नागरिकांच्या मूलभूत समस्या सोडविण्यासाठी व नागरी सुविधांमध्ये वाढ करण्यासाठी नियोजन आवश्यक आहे. लोकप्रतिनिधींचा प्रशासनात सहभाग आहे, त्यामुळे अधिकाऱ्यांनी सर्वांना विश्वासात घेऊन समन्वयातून काम करावे. शहराचा विकास करताना पायाभूत सुविधा अधिक बळकट करण्यावर भर दिला पाहिजे आणि त्या अनुषंगाने अंदाजपत्रकात ठोस तरतूद असावी. शासनस्तरावरून आवश्यक त्या बाबी पूर्ण करण्यासाठी आम्ही प्रयत्न करू. प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्या संयुक्त सहभागातूनच प्रत्येक नागरिकापर्यंत सेवा प्रभावीपणे पोहोचू शकतील.

- प्रशांत शितोळे, सत्तारूढ पक्षनेते, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

### आर्थिक स्थितीचा सखोल आढावा..

» बैठकीदरम्यान मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रविण जैन यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीचा तपशीलवार आढावा सादर केला. यामध्ये सर्वसाधारण निधीची तरतूद, विविध बँकांमधील मुदत ठेवी, विद्यमान कर्जाची स्थिती, मागील चार वर्षांतील जमा खर्च, मासिक महसुली खर्चाची आवश्यकता, अस्थायी अस्थापनेवरील कर्मचाऱ्यांची संख्या व त्यांना देण्यात येणारे मानधन, दायित्व निधी, मुद्रांक शुल्क व अन्य उत्पन्नाचा गोषवारा तसेच करसंकलन विभागाची मागील तीन वर्षांची आणि चालू वर्षातील कामगिरी यांचा समावेश होता. यासोबतच विविध विभागांना प्रस्तावित निधीची तरतूद, अंतिम टप्प्यात असलेली विकासकामे आणि नव्याने सुरू करण्यात येणाऱ्या प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला.

"शहराचा विकास हा नागरिकांच्या जीवनमानाशी थेट जोडलेला आहे. नागरी केंद्रित विकास साधायचा असेल तर प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्यात प्रभावी समन्वय आवश्यक आहे. अंतिम टप्प्यातील कामे प्राधान्याने पूर्ण करून नागरिकांना त्याचा लाभ मिळाला पाहिजे. वाढती लोकसंख्या लक्षात घेता पाणीपुरवठा, आरोग्य व वैद्यकीय सुविधा बळकट करणे अत्यावश्यक आहे. पर्यावरण, आरोग्य, क्रीडा आणि वैद्यकीय सेवा या मुख्य क्षेत्रांवर भरीव तरतूद करून प्रत्येक घटकापर्यंत सुविधा पोहोचतील, याची हमी देणारे अंदाजपत्रक सादर करणे गरजेचे असून सर्वसामान्य नागरिकांचे समाधान हेच प्रशासन व लोकप्रतिनिधी यांचे अंतिम ध्येय असावे.

- रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

# पिंपळे सौदागर येथील रोझलँड रेसिडेन्सीत तीव्र पाणीटंचाईचा प्रकार

## पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून होणाऱ्या पाणीपुरवठ्यात अचानक घट झाल्यामुळे रोझलँड रेसिडेन्सी सोसायटीमध्ये तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून होणाऱ्या पाणीपुरवठ्यात अचानक घट झाल्यामुळे पिंपळे सौदागर येथील रोझलँड रेसिडेन्सी सोसायटीमध्ये तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली. नळांना कमी दाबाने पाणी, तर काही वेळा पूर्णपणे पाणीपुरवठा खंडित झाल्याने रहिवाशांना दैनंदिन गरजांसाठी अडचणींचा सामना करावा लागला.



या पार्श्वभूमीवर सोसायटीचे सचिव विक्रम शिंदे यांनी तातडीने पुढाकार घेत लोकप्रतिनिधी व प्रशासन यांच्याशी संपर्क साधला. परिस्थितीची गांभीर्याने दखल घेत भाजप अध्यक्ष व नवनिर्वाचित नगरसेवक शत्रुघ्न काटे, कुंदा भिसे व अनिता काटे यांनी महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांसह सोसायटीला भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली.

# मेट्रो महिलांच्या हाती; 'पिंक लाईन'वर महिला ट्रेन पायलट

## पहिल्या टप्प्यात 100 महिला पायलटची नेमणूक; मार्च 2026 मध्ये मेट्रो सुरू होण्याचे लक्ष्य

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे शहरातील तिसरा मेट्रो मार्ग म्हणजेच माण, हिंजवडी ते शिवाजनीगर (पिंक लाईन) ही मेट्रो सेवा प्रत्यक्षात मार्गावर धावण्यासाठी संबंधित कंपनीचे प्रयत्न सुरु आहेत. या मेट्रोचे स्टेअरिंग महिलांच्या हातात देण्यात येणार आहे. अभियंता असलेल्या तरुणींना मेट्रोचे सारथ्य करण्यासाठी त्यांचे प्रशिक्षण देखील पूर्ण झाले आहे. पहिल्या टप्प्यात शंभर महिला ट्रेन पायलटची नेमणूक केली असून, पुणे आयटी सिटी मेट्रो रेल लिमिटेडने या प्रकल्पाच्या संचलन आणि देखभाल करणार आहे.

सार्वजनिक-खाजगी भागीदारीतून आकाराला येत असलेल्या या प्रकल्पात टाटा आणि सीमेन्स यांसारख्या कंपन्यांचा सहभाग आहे. मात्र, केवळ महिलांच्या हाती संचलनाची धुरा सोपवण्याचा हा निर्णय जागतिक रेल्वे क्षेत्रात 'अद्वितीय उपक्रम' म्हणून ओळखला जाणार आहे. या ट्रेन पायलट महिलांच्या निवडीसोबतच त्यांच्या सुरक्षिततेसाठी विशेष 'प्रोटोकॉल' तयार करण्यात आले आहेत. कामाच्या ठिकाणापासून ते प्रवासापर्यंतच्या सुरक्षिततेची जबाबदारी ही कंपनी घेणार आहे. हा प्रकल्प केवळ वाहतुकीचे साधन नसून तो महिला सक्षमीकरणाचे जागतिक प्रतीक ठरेल, असा विश्वास 'पीएमआरडीए'ने व्यक्त केला

दरम्यान, हा मार्ग मार्च 2026 मध्ये सुरु करण्यासाठी संबंधित कंपनीकडून प्रयत्न सुरु आहेत. तांत्रिक आणि सिग्नलचे काम झाले आहे. त्यानुसार या कामाचे प्रशिक्षण संबंधित महिलांना देण्यात येत आहे. तसेच, या कामाची माहिती व कामाचे स्वरुप समजून सांगण्यात येत आहे. त्यामुळे आता मेट्रोची सुरुवात झाल्यानंतर त्याबाबतचे सर्व नियंत्रण हे या महिलांचे असणार आहे.

हिंजवडीतील आयटी हबमधून शिवाजीनगरला पोहोचण्यासाठी रस्ते मार्गाने दीड तासांचा वेळ लागतो. मेट्रोमुळे हे अंतर अवघ्या 40 मिनिटांत पार करणे शक्य होईल. यामुळे लाखो आयटी कर्मचाऱ्यांची वाहतूक कोंडीतून सुटका होणार आहे. आधुनिक तंत्रज्ञान आणि सामाजिक समावेशकता यांचा मेळ घालत 'पीएमआरडीए'ने पुण्याच्या सार्वजनिक वाहतूक आणखी बळकट केली आहे.





### फ्रेंच कंपनीकडून प्रशिक्षण

» पुणे व परिसरातील बी.टेक इंजिनिअर अथवा संबंधित क्षेत्रातील व्यक्तींना मुलाखतीद्वारे निवडले जाते. फ्रेंच येथील किओलिस या कंपनीकडून त्याचे नियंत्रण राहणार आहे. या उमेदवारांकडून चार महिन्यांचे प्रशिक्षण पूर्ण करुन घेतले जाते. त्यातून उमेदवार निवडले जातात. सध्या या सर्व महिला पायलटना थेट ट्रेन चालविण्याचे प्रशिक्षण दिले जात आहे. माण डेपो येथे त्यांचे प्रशिक्षण सुरु आहे. त्यानंतर त्यांची शारीरिक तंदुरुस्ती चाचणी घेतली जाते. पायलट म्हणून निवड झालेल्या तरुणींच्या चेहऱ्यावर या 'हटके' काम शिकत असल्याचा आनंद दिसून आहे.

### अशी आहे मेट्रो

- » मेट्रो लाईन 3 : पीएमआरडीए, टाटा आणि सीमेन्स
- » मार्ग: हिंजवडी (मेगापोलिस सर्कल) ते शिवाजीनगर (दिवाणी न्यायालय)
- » एकूण लांबी: 23 किमी (पूर्णतः उन्नत मार्ग)
- » स्थानके: 23 अत्याधुनिक स्थानके
- » यंत्रणा: 22 अ‍ॅल्स्टॉम मेट्रो ट्रेन
- » सद्यस्थिती : स्ट्रक्चर काम पूर्ण, चाचणी सुरु

> मेट्रोच्या संबंधित सर्व यंत्रणांकडून वेळेत पूर्ण करण्याची प्रक्रिया सुरु आहे. त्यापैकी एक असलेल्या मेट्रो ड्राईव्ह करण्यासाठी शंभर महिलांची नेमणूक केली असून, पहिल्या टप्प्यात 50 जणांची निवड देखील केली आहे. त्यांचे अंतिम प्रशिक्षण सुरु आहे.
>
> - अनिल सैनी, मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे सिटी मेट्रो रेल लिमीटेड

# तब्बल तीन लाख विद्यार्थी कागदोपत्री 'शालाबाह्य'

## प्रणालीतील घोळामुळे अनेक शाळांमधील प्रत्यक्ष उपस्थित विद्यार्थी कागदोपत्री दिसत नाहीत.

**पिंपरी | प्रतिनिधी**

आधार आणि 'यूडायस प्लस'या पोर्टलवरील शैक्षणिक नोंदणीत गंभीर त्रुटी समोर आल्या आहेत. यात आधार कार्ड अद्ययावत नसलेले शहरातील तब्बल दोन लाख ९६ हजार ७७८ विद्यार्थी शालाबाह्य ठरण्याची भीती आहे. याचा थेट फटका शाळांना बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

प्रणालीतील घोळामुळे अनेक शाळांमधील प्रत्यक्ष उपस्थित विद्यार्थी कागदोपत्री दिसत नाहीत. विद्यार्थ्यांचे नाव, जन्मतारीख किंवा अन्य माहितीतील तफावतीमुळे सुमारे १३ हजार ८६७ विद्यार्थ्यांचे आधार अवैध ठरत आहेत. ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या शालेय नोंदी संकटात सापडल्या आहेत. परिणामी, लाखो विद्यार्थी 'शाळाबाह्य' किंवा 'अवैध' ठरण्याचा धोका निर्माण झाला आहे. विद्यार्थ्यांची संख्या लक्षात घेऊन संचमान्यता करण्यात येते. सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांची आधारकार्डच्या आधारे नोंदणी केली जात आहे.

'यूडायस प्लस' प्रणालीमध्ये आधार पडताळणी आवश्यक असल्याने अनेक विद्यार्थ्यांची नोंद अपात्र (इन्व्हॅलिड), उपलब्ध नसलेले (नॉट प्रोव्हायडेड) किंवा पडताळणीतील (अंडर व्हेरिफिकेशन) अशा टप्प्यात अडकली आहेत. त्यामुळे विद्यार्थी प्रत्यक्ष वर्गात नियमित बसत असतानाही तो सरकारी प्रणालीत शाळेबाहेर दाखवला जात आहे. या विद्यार्थ्यांना शालाबाह्य म्हणून वर्गीकृत होण्याचा धोका निर्माण झाला आहे. यामुळे शाळांच्या विद्यार्थी संख्येवर परिणाम होत असून, त्याचा थेट फटका शिक्षक भरती, अनुदान, मध्यान्ह भोजन योजना, शिष्यवृत्ती आणि इतर शैक्षणिक सुविधांवर बसत आहे. आधार आणि 'यूडायस प्लस'या पोर्टलवरील शैक्षणिक नोंदणीत गंभीर त्रुटी समोर आल्या आहेत. यात आधार कार्ड अद्ययावत नसलेले शहरातील तब्बल दोन लाख ९६ हजार ७७८ विद्यार्थी शालाबाह्य ठरण्याची भीती आहे.



> आधार, यूडायस प्लस यंत्रणेत नोंदणीसाठी सतत ऑनलाइन व ऑफलाइन माध्यमातून बैठका सुरू आहेत. विद्यार्थ्यांकडे वैध आधार कार्ड असणे आवश्यक आहे. मात्र, विद्यार्थी व पालक यांच्या आधार कार्डमध्ये चुका असल्याचे अपार नोंदणी होत नाही, तर यूडायस नोंदणीमधील चुका दुरुस्त करण्यासाठी शिबिरे आयोजित केली जात आहेत.
>
> - संगीता बांगर, प्रशासन अधिकारी, शिक्षण विभाग

> विद्यार्थ्यांच्या माहितीतील चूक दुरुस्त केली नाही, तर पुढील काही वर्षांत हजारो विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहतील. मुख्याध्यापकांनी आपापल्या शाळांमधील विद्यार्थ्यांच्या आधाराबाबत हरकती नोंदवाव्यात.
>
> - महेंद्र गणपुले, सदस्य, राज्य अभ्यासक्रम आराखडा समिती

# महापौर मंजूषा नागपुरे ॲक्शन मोडवर, प्रशासनाला दिले महत्वपूर्ण निर्देश

## मुळा-मुठा नदी सुधारा प्रकल्पाचा 3 दिवसांत अहवाल देण्याचाही दिला निर्देश...

**पुणे | प्रतिनिधी**

पावसाळ्यापूर्व आपत्ती व्यवस्थापन, नालेसफाई आणि मुळा-मुठा नदी सुधार प्रकल्पाचा तातडीने आढावा घेण्याचे आदेश नवनियुक्त महापौर मंजूषा नागपूरे यांनी पुणे महापालिका प्रशासनाला दिले आहेत. शहरातील नागरिकांची सुरक्षा आणि मूलभूत सुविधा हे सर्वोच्च प्राधान्य असल्याचे स्पष्ट करत, नाले व पावसाळी लाईनची साफसफाई येत्या ३० एप्रिलपर्यंत पूर्ण करण्यात यावेत. तसेच या कामांचे नियोजन कसे केले जाणार आहेत, याचीही माहिती सादर करण्यास सांगण्यात आले आहे.

महापौर पदाची धुरा स्वीकारल्यानंतर पहिल्याच टप्प्यात पावसाळ्याच्या तयारीवर लक्ष केंद्रित करत नागपूरे यांनी आयुक्तांना पत्र पाठवून प्रशासनाला स्पष्ट निर्देश दिले. या कामात कोणतीही दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला आहे. यापूर्वी महापालिकेच्या उदासीन कारभाराचा फटका पुणे शहराला बसला होता. वेळेवर नालेसफाई झाली नव्हती. परिणामी अनेक भागांत रस्त्यांवर पाणी साचणे, वाहतूक कोंडी, वाहनांची हानी आणि नागरिकांना त्रास सहन करावा लागला होता. या पार्श्वभूमीवर यंदा अशा घटना टाळण्यासाठी नालेसफाई वेळेत करण्याचा धडा घेत प्रशासनाने युद्धपातळीवर काम करावे, अशी अपेक्षा महापौरांनी व्यक्त केली आहे.



### नदी सुधार प्रकल्पाच्या प्रगतीचा अहवाल दिन दिवसात द्या.

» दरम्यान, मुळा-मुठा नदी सुधार प्रकल्पाच्या सध्याच्या प्रगतीचा आणि पावसाळ्यातील सुरक्षेचा सविस्तर अहवाल येत्या तीन दिवसांत महापौर कार्यालयात सादर करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. पावसाळ्यात नदीपात्रात गाळ साचणे, प्रवाह अडथळे, नदीकाठच्या वस्त्यांतील धोका आणि नदी सुधार प्रकल्पामुळे निर्माण होणाऱ्या तात्पुरत्या अडचणी याबाबत प्रशासनाने स्पष्ट माहिती द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

महापौरांच्या आदेशानुसार, क्षेत्रीय कार्यालय स्तरावर नालेसफाईच्या कामांची दैनंदिन नोंद ठेवण्यात येणार असून, त्याचा अहवाल थेट महापौर कार्यालयास सादर करावा लागणार आहे. यामुळे नालेसफाईची जबाबदारी निश्चित होईल, तसेच वेळेत काम पूर्ण न झाल्यास संबंधित विभागप्रमुखांवर उत्तरदायित्व निश्चित करण्याचा इशाराही प्रशासनाला मिळाला आहे.

गेल्या काही वर्षांतील अतिवृष्टीचा अनुभव लक्षात घेता पुणे शहरातील काही भाग आणि नदीकाठच्या वस्त्यांमध्ये पुराचा धोका वाढलेला आहे. यामुळे प्रशासनाने पूरप्रवण 'हॉटस्पॉट्स'ची यादी अद्ययावत करावी आणि पाणी साचू नये यासाठी तातडीने उपाययोजना सज्ज ठेवाव्यात, असेही महापौरांनी आदेशात नमूद केले आहे. विशेषतः पंपिंग स्टेशन्स, तात्पुरते पाणी उपसा यंत्र, पाण्याचा प्रवाह मोकळा ठेवण्यासाठीची यंत्रणा आणि आपत्कालीन कर्मचारी व्यवस्था तयार ठेवण्यासही सांगण्यात आले आहे.

### महापौरांचे निर्देश

- » सर्व प्रमुख नाले व पर्जन्यवाहिन्यांची साफसफाई ३० एप्रिलपर्यंत पूर्ण करा
- » क्षेत्रीय कार्यालयांनी कामांची दैनंदिन नोंद ठेवून अहवाल महापौर कार्यालयास सादर करणे बंधनकारक
- » पूरप्रवण 'हॉटस्पॉट्स'ची यादी अद्ययावत करून तिथे उपाययोजना सज्ज ठेवणे
- » पंपिंग स्टेशन्स आणि आवश्यक यंत्रणा आतापासूनच तयार ठेवणे
- » मुळा-मुठा नदी सुधार प्रकल्पाचा प्रगती अहवाल ३ दिवसांत सादर करा
- » पावसाळ्यापूर्वी सुरू असलेली खोदकामे पूर्ण करून रस्ते पूर्वस्थितीत आणण्यासाठी नियोजन करा
- » नवीन खोदकाम परवानगीसाठी तारीख निश्चित करणे

### मागील वर्षांचा धडा, अन्..

» पुण्यात मागील काही वर्षांत नालेसफाई वेळेत न झाल्याने अनेक भागांत रस्त्यांवर पाणी साचण्याच्या घटना घडल्या होत्या. यामुळे वाहतूक विस्कळीत होणे, नागरिकांच्या घरांमध्ये पाणी शिरणे, तसेच दैनंदिन जीवन ठप्प होण्याचे प्रकार वारंवार घडले. या पार्श्वभूमीवर यंदा नालेसफाई वेळेत पूर्ण करण्यासाठी महापौरांनी थेट प्रशासनाला कडक निर्देश दिले आहेत.

# अनधिकृत बांधकामांना 'पीएमआरडीए'चा दणका; चार हजार चौरस फूटांचे क्षेत्र मोकळे

## पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) अनधिकृत बांधकामांविरुद्ध धडक मोहीम राबविली.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) मंगळवारी अनधिकृत बांधकामांविरुद्ध धडक मोहीम राबविली. प्राधिकरणाच्या सेक्टर ९ आणि ११ मधील पत्राशेड्स, गॅरेजेस तसेच भोर तालुक्यातील अनधिकृत होर्डिंगवर ही कारवाई करण्यात आली. या मोहिमेत सुमारे ४ हजार चौरस फूट बांधकाम पाडण्यात आले असून, अडीच एकर शासकीय जागा मोकळी करण्यात आली आहे.



सेक्टर ९ मधील पत्राशेड, तसेच सेक्टर ११ मधील ४५ मीटर रस्त्यालगत असलेल्या गॅरेज आणि लेबर कॅम्पवर (कोठी) कारवाई करण्यात आली. वाहनतळासाठी आरक्षित जागेवर उभारलेली बेकायदा पत्राशेड हटवून २५ एकर क्षेत्र मोकळे करण्यात आले. या परिसरातील इतर टपरीचालक आणि वाहनतळधारकांना जागा तातडीने मोकळ्या करण्याच्या सूचना प्रशासनाकडून देण्यात आल्या आहेत. तसेच, भोर तालुक्यातील शिंदेवाडी येथेही 'पीएमआरडीए'च्या पथकाने कारवाई केली. बेकायदा होर्डिंग्ज हटवण्याचे काम सध्या प्रगतिपथावर असल्याची माहिती पीएमआरडीए प्रशासनाकडून देण्यात आली.

> हद्दीतील अनधिकृत बांधकामांना आळा घालण्यासाठी ही मोहीम राबवण्यात आली. नागरिकांनी आणि बांधकामधारकांनी पीएमआरडीएची रीतसर परवानगी घेऊनच बांधकामे करावीत, अन्यथा कठोर कारवाई करण्यात येईल.
> - डॉ. दीप्ती सूर्यवंशी-पाटील, सहआयुक्त, पीएमआरडीए

या मोहिमेत सुमारे ४ हजार चौरस फूट बांधकाम पाडण्यात आले असून, अडीच एकर शासकीय जागा मोकळी करण्यात आली आहे. महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे, अतिरिक्त महानगर आयुक्त दीपक सिंगला, आणि दक्षता विभागाचे पोलीस अधीक्षक अमोल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभागाच्या सहआयुक्त डॉ. दीप्ती सूर्यवंशी-पाटील, उपायुक्त आशा होळकर, तहसीलदार रवींद्र रांजणे यांच्यासह नियोजन सहाय्यक आणि अभियंत्यांच्या पथकाचा सहभाग होता.

# पालकमंत्री सुनेत्रा पवार यांची पुण्यात पहिली बैठक...

## जिल्हा प्रशासनाने 2026-27 या वर्षाचा 1 हजार 32 कोटींचा वार्षिक आराखडा तयार केला आहे

**पुणे | प्रतिनिधी**

जिल्हा नियोजन समितीची नव्या वर्षातील पहिली बैठक येत्या गुरुवारी (१२ फेब्रुवारी) होणार आहे. उपमुख्यमंत्री आणि पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक होणार असून, सन २०२६-२७ या वर्षासाठीच्या १ हजार ३७ कोटी रुपयांच्या वार्षिक आराखड्याचे सादरीकरण बैठकीत केले जाणार आहे. दरम्यान, गेल्या वर्षीच्या तुलनेत ६० कोटी रुपये कमी असलेला आराखडा जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आला आहे. जिल्हा प्रशासनाने २०२६-२७ या वर्षाचा १ हजार ३२ कोटींचा वार्षिक आराखडा तयार केला आहे. गेल्या वर्षी (२०२५-२६) जिल्हा प्रशासनाने १ हजार ९२ कोटी रुपयांचा आराखडा तयार केला होता.

दरम्यान, उपमुख्यमंत्री, पालकमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर होत असलेल्या या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीकडे सर्वांचे लक्ष लागले असून जिल्ह्यातील आमदार, लोकप्रतिनिधींना जिल्हा प्रशासनाकडून सदस्यांना निमंत्रणे पाठविण्यात आली आहेत. विधानभवनात गुरुवारी सकाळी नऊ वाजता ही बैठक होईल.



### गेल्या वर्षीचा आराखडा

**» गेल्या वर्षीच्या आराखड्यात प्रथमच अजित पवार यांनी रस्ते, वीज, स्मशानभूमी, समाजमंदिरे यासारख्या पायाभूत सुविधांचा समावेश केला होता. पण त्यापेक्षा जिल्हा परिषदेच्या शाळा आणि जिल्ह्यातील आरोग्य केंद्राच्या सुधारणेवर भर दिला होता. जिल्ह्यात मॉडेल स्कूल, आणि मॉडेल पीएचसी हे दोन नवे प्रकल्प हाती घेण्यात आले होते. जिल्ह्यातील ३०३ शाळांचे मॉडेल स्कूल तर १०८ पैकी २४ आरोग्य केंद्राची सुधारणांचा समावेश होता.**

जिल्हा प्रशासनाने २०२६-२७ या वर्षाचा १ हजार ३२ कोटींचा वार्षिक आराखडा तयार केला आहे. गेल्या वर्षी (२०२५-२६) जिल्हा प्रशासनाने १ हजार ९२ कोटी रुपयांचा आराखडा तयार केला होता. राज्य सरकारने २८७ कोटींचा अतिरिक्त निधी देऊन तो १ हजार ३७९ कोटींच्या आराखड्याला मंजुरी दिली होती.

यंदा जिल्हा नियोजन समितीच्या आराखड्याचे उद्दिष्ट कमी रकमेचे करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार, गेल्या वर्षीच्या तुलनेत ६० कोटी रुपयांनी कमी हा आराखडा करण्यात आल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली.

### वार्षिक आराखड्याचे सादरीकरण

**» उपमुख्यमंत्री आणि पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक होणार असून, सन २०२६-२७ या वर्षासाठीच्या १ हजार ३७ कोटी रुपयांच्या वार्षिक आराखड्याचे सादरीकरण बैठकीत केले जाणार आहे. दरम्यान, गेल्या वर्षीच्या तुलनेत ६० कोटी रुपये कमी असलेला आराखडा जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आला आहे.**

### प्रशासनाकडून सदस्यांना निमंत्रणे

**» उपमुख्यमंत्री, पालकमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर होत असलेल्या या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीकडे सर्वांचे लक्ष लागले असून जिल्ह्यातील आमदार, लोकप्रतिनिधींना जिल्हा प्रशासनाकडून सदस्यांना निमंत्रणे पाठविण्यात आली आहेत. विधानभवनात गुरुवारी सकाळी नऊ वाजता ही बैठक होईल.**

गेल्या वर्षीच्या आराखड्यात प्रथमच अजित पवार यांनी रस्ते, वीज, स्मशानभूमी, समाजमंदिरे यासारख्या पायाभूत सुविधांचा समावेश केला होता. पण त्यापेक्षा जिल्हा परिषदेच्या शाळा आणि जिल्ह्यातील आरोग्य केंद्राच्या सुधारणेवर भर दिला होता. जिल्ह्यात मॉडेल स्कूल, आणि मॉडेल पीएचसी हे दोन नवे प्रकल्प हाती घेण्यात आले होते. जिल्ह्यातील ३०३ शाळांचे मॉडेल स्कूल तर १०८ पैकी २४ आरोग्य केंद्राची सुधारणांचा समावेश होता. त्यासाठी सुमारे २५० ते ३०० कोटी रुपयांचा निधी देण्यात आला होता. या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीकडे सर्वांचे लक्ष लागले असून जिल्ह्यातील आमदार, लोकप्रतिनिधींना जिल्हा प्रशासनाकडून सदस्यांना निमंत्रणे पाठविण्यात आली आहेत. विधानभवनात गुरुवारी सकाळी नऊ वाजता ही बैठक होईल.

# पुणे जिल्हा परिषदेत राष्ट्रवादीचे स्पष्ट बहुमत; अध्यक्षपदासाठी जोरदार रस्सीखेच

## 73 पैकी 51 गटांत विजय; अनुभवी की तरुण चेहऱ्याला संधी? बारामती-इंदापूर-दौंडकडेही लक्ष

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने घवघवीत यश मिळवत स्पष्ट बहुमत मिळविले आहे. 73 पैकी तब्बल 51 गटांमध्ये राष्ट्रवादीने विजय मिळविल्याने जिल्हा परिषदेतील सत्तेचे चित्र जवळपास स्पष्ट झाले आहे. या यशानंतर आता सर्वांचे लक्ष जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदाकडे लागले आहे. पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद पुढील अडीच वर्षांसाठी सर्वसाधारण गटासाठी राखीव असल्याने अध्यक्षपदाची माळ कोणाच्या गळ्यात पडणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या पदासाठी निकाल लागताच जोरदार रस्सीखेच सुरू झाली आहे.



एकीकडे पक्षातील ज्येष्ठ आणि अनुभवी सदस्यांना संधी दिली जाणार का? तर दुसरीकडे नव्या आणि तरुण चेहऱ्याला नेतृत्वाची संधी मिळणार? असे प्रश्न उपस्थित झाले आहेत. अध्यक्षपदाबरोबरच उपाध्यक्ष आणि विविध सभापतिपदांसाठीही चुरस पाहायला मिळण्याची शक्यता आहे. या पदांवर कोणाला संधी मिळणार? हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसकडून निवडून आलेल्या अनेक सदस्यांना राजकीय अनुभव आहे. यात दौंड तालुक्यातील खडकी गटातून वीरधवल जगदाळे, आंबेगाव तालुक्यातील पारगाव तर्फे अवसरी गटातून विवेक वळसे पाटील, शिरूर तालुक्यातील मांडवगण फराटा गटातून सुजाता पवार, इंदापूर तालुक्यातील बावडा गटातून अंकिता हर्षवर्धन पाटील, काटी गटातून श्रीमंत ढोले, मुळशी तालुक्यातील पिरंगुट गटातून शांताराम इंगवले, तर भोर तालुक्यातील भोंगवली गटातून विक्रम खुटवड यांचा समावेश आहे. हे सर्व सदस्य यापूर्वीही जिल्हा परिषदेत निवडून आले आहेत. तेथे कसे कामकाज चालते, याचा चांगला अनुभव आहे. याचबरोबर यंदाच्या निवडणुकीत राजकीय पार्श्वभूमी असलेले अनेक तरुण चेहरेही प्रथमच जिल्हा परिषदेत पोहचले आहेत.

### बारामती, इंदापूर, दौंड तालुक्याला संधी मिळेल का?

**» बारामती, इंदापूर आणि दौंड या तालुक्यांत राष्ट्रवादी काँग्रेसला भरभरून मतदान झाले आहे. विशेष म्हणजे, दौंडमध्ये भाजपचे विद्यमान आमदार असतानाही 7 पैकी 6 गटांत राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार विजयी झाले आहेत. त्यामुळे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना राजकीय श्रद्धांजली म्हणून या भागातून निवडून आलेल्या सदस्याला अध्यक्षपद दिले जावे, अशी मागणी काही कार्यकर्त्यांकडून केली जात आहे.**